MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue, January- 2019

International Multilingual Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा द्वारा संचालीत
आणि
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक १८ ते १९ जानेवारी २०१९

# जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव

आयोजक

## समाजशास्त्र विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

Vidyawarta Special Issue, January -2019 SPECIAL ISSUE

Vidyawarta™
International Multilingual Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा व्दारा संचालित
आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

व्दारा आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १८ व १९ जानेवारी २०१९

## ''जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव''

**मुख्य संपादक**

**डॉ. स्निग्धा राजेश कांबळे,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर

**सहसंपादक**

**डॉ. कुंदन दुफारे,**

श्री. जी. सी. पा. मुनघाटे महाविद्यालय, धानोरा, जि. गडचिरोली

**संपादक मंडळ**

**डॉ. अशोक सालोटकर,**
गो. वा. महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपुर

**डॉ. संजय कुंभारे,**
श्री गोविंदप्रभु कला, वाणिज्य महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**प्रा. संजय चव्हाण,**
यादवराव पोशट्टीवार महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**डॉ. विजय दिघोरे,**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर

**प्रा. बालाजी दमकोंडवार,**
नेवजाबाई हितकारीनी महाविद्यालय,
ब्रह्मपुरी, जि. चंद्रपुर

**डॉ. रविंद्र विखार,**
श्री गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय,
कुरखेडा, जि. गडचिरोली

13) समाज परिवर्तन वृत्तपत्रांची भूमिका : एक सामाजशास्त्रीय अभ्यास
डॉ. कालिदास भांगे, डॉ. पुरूषोत्तम रामटेके, औरंगाबाद || 90

14) समाजमाध्यमे आणि जमातवादाची आव्हाने
प्रा.डॉ. नारायण तु. कांबळे, लातूर || 95

15) प्रसारमाध्यमे आणि बदलते जीवनप्रवाह
डॉ. विजय शंकरराव दिघोरे, नागपूर || 99

16) कुटुंब, विवाह व आप्तसंबंधावर सामाजिक प्रसारमाध्यमांचा परिणाम
प्रा. विठ्ठल शामराव आत्राम, चंद्रपूर || 102

17) प्रसार माध्यमांचा भारतीय समाजावरील प्रभाव
प्रा. डॉ. डी. एस. नामूर्ते, अमरावती || 107

18) जनसंवाद आणी सामाजिक माध्यमांचे सैध्दांतिक दृष्टीकोन
डॉ. डी. जी. म्हशाखेत्री, गडचिरोली || 111

19) समाज माध्यमांचे वाढते चलन आणि दुरूपयोग
प्रा. दिलीप जीवन रामटेके, चंद्रपूर || 115

20) प्रसारमाध्यमे आणि बदलते विचार प्रवाह
प्रा. राजकुमार भगत, गोंदिया || 119

21) भारतातील लिंगभाव आणि माध्यमांचा हस्तक्षेप
प्रा.डॉ.बी.एम.कांबळे, नांदेड || 121

22) प्रसार माध्यमे आणि सामाजिक बदल
प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे, चंद्रपूर || 125

23) भारतीय समाजावर प्रसारमाध्यमांचा परिणाम
प्रा. दिपक एम. सुखदेवे, चंद्रपूर || 128

24) प्रसार माध्यमे व बदलते जीवनप्रवाह
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार, गडचिरोली || 131

25) जागतिकीकरण प्रक्रियेत स्त्री संदर्भात प्रसार माध्यमांची भूमिका
प्रा. सतिश गोवर्धन पेटकर, चंद्रपूर || 134

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

आहेत. अशा विस्तारलेल्या प्रेक्षकांच्या मनोरंजनाच्या कल्पनाही विशिष्ट गटापुरत्या मर्यादित राहणार नाहीत. हे लक्षात घेऊनच या प्रसारमाध्यमांची प्रक्षोभापेक्षा सामंजस्यावर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. परंतु समकालीन व्यवस्थेमध्ये समाजमाध्यमाची भूमिका ही जमातवादी व्यवस्थेत प्रोत्साहन देणारी राहिली आहे. एका अर्थाने जाती विषमतेला धारा देणे अशा काही गोष्टीचा समाजमाध्यमे वापर करीत आहेत ही कठीण परिस्थिती आहे.

**सारांश**

थोडक्यात लोकशाहीच्या चार महत्त्वाच्या घटकातील माध्यमे हा महत्त्वाचा घटक आज चर्चेला आला आहे. लोकशाही मूल्यांची आणि आदर्शांची पेरणी आणि उभारणी करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याची क्षमता प्रसार माध्यमांमध्ये राहिलेली दिसून येत नाही. आज माध्यमांचे नैतिक विश्व बदलले आहे. प्रसारमाध्यमे आणि वास्तव यांचा संबंध तुटत चालला आहे. माहितीची वाहक असलेली जनसंवाद आणि सामाजिक माध्यमे सामाजिक बांधिलकी जोपासताना दिसत नाहीत. माध्यमे आणि माध्यमांद्वारे मुद्दामहून पसरविल्या जाणाऱ्या अफवा, 'पेड' न्यूज, खोडसाळ बातम्या, व्यक्ती व समाजाची दिशाभूल करुन समाजाचे ध्रुवीकरण करून जमातवाद वाढविण्यास हातभार लावीत आहेत. माध्यमे व समाजमाध्यमांचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. परंतु समकालीन समाजव्यवस्थेत ही माध्यमे व समाजमाध्यमे जाती, धर्माच्या नावावर समाजात विसंवाद निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरत असलेली दिसून येत आहेत याची माध्यमांनी जाण आणि भान ठेवणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१. पानतावणे, गंगाधर. १९९१. पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर. पुणे : प्रतिमा प्रकाशन.
२. हिवराळे, सुखराम. २०१६. औरंगाबाद : आनंद प्रकाशन.
३. कांबळे, नारायण. २०१४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि समकालीन वास्तव. औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.
४. आढाव, बाबा व इतर (संपा.) १९७९. पुरोगामी सत्यशोधक अंक ३ वर्ष ५. पुणे : अनिल अवचट

□□□

**15**

# प्रसारमाध्यमे आणि बदलते जीवनप्रवाह

डॉ. विजय शंकरराव दिघोरे
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर

**********

**प्रस्तावना :—**

आधुनिक युग हे माहिती आणि प्रसार माध्यमाचे युग आहे. डिजीटल युग आजच्या जगाची ओळख आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माहिती आणि तंत्रज्ञानाने शिरकाव केला आहे. प्रसारमाध्यमानी जीवनाच्या सर्व क्षेत्रातही माहिती अगदी सर्वसामान्यापर्यंत पोहचविली आहे वर्तमान जीवनाबरोबरच अनेक तर्क या क्षेत्रात लावण्यात येत आहेत. प्रसारमाध्यमामुळे जीवनात आमुलाग्र बदल आपणास दैनंदिन जीवनात दिसून येत आहे. बदलत्या वातावरणात जर जगायचे असेल, वावरायचे असेल तर प्राणि सुध्दा स्वत:मध्ये काही विशिष्ट प्रकारचे बदल करून घेतात. अश्याप्रकारे जर आपल्याला या चालु असलेल्या युगात टिकूण रहायच असेल तर आपल्यामध्येही आपण काळानुसार बदल करून घेतले पाहिजेत. म्हणजेच आजच्या युगात अॅन्ड्राईड मोबाईल फोन हे एक काळाची गरज बनला आहे. त्यामुळे आज सर्वांकडेच पहायला मिळतो. परिस्थितीमुळे गरीब असो व श्रीमंत समाजातील सर्वजनच या सामाजिक माध्यमाचा उपयोग करतात आज तर मोठया प्रमाणात सोशल मिडीया ही अपरिहार्य गोष्ट बनली आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात राहु इच्छिणाऱ्या, काहीतरी करू इच्छिणाऱ्या आजच्या काळात कुनालाही सोशल मिडीया शिवाय जगणे कठीन आहे. हा बदल अलिकडच्या काळातले आहे. खाजगीकरण, उदारिकरण, व जागतिकीकरण या धोरणामुळे जग जवळ आले आहे. आरोग्य सेवा, शिक्षण, संगीत, चित्रपट, साहित्य, उपभोग आणि प्रसारमाध्यमे या क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल झालेला दिसून येत आहे.

उद्देश :—

१. प्रसारमाध्यमाविषयीची भूमिका व माहिती जाणून घेणे.

२. प्रसारमाध्यमामुळे मानवाच्या जिवनावर झालेले परिणाम अभ्यासने.

३. प्रसारमाध्यमामुळे सामाजिक जिवनावर झालेले सकारात्मक व नकारात्मक बदल अभ्यासने.

४. प्रसारमाध्यमाच्या बदलत्या जीवनप्रवाहाचे मुल्यमापन करणे.

गृहित कृत्ये :—

१. प्रसारमाध्यमाचा प्रभाव पडून संपुर्ण मानवी जिवनावर बदल घडून येईल.

२. प्रसारमाध्यमाचा मानवी जीवनात समावेशामुळे समाजाचा विकास होईल.

३. प्रसारमाध्यमामुळे समाजात विघातक गोष्टी घडून येईल.

४. प्रसारमाध्यमामुळे मानवी जीवनपैलूचे उद्देश पुर्ण होईल.

५. प्रसारमाध्यमामुळे सामाजिक जीवनात स्पर्धा, संघर्ष, तनाव निर्माण होईल.

अध्ययनपध्दती :—

प्रस्तुत शोधनिबंधासाठी निदानात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. एखादया समस्येविषयी वास्तविक स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणे आणि त्याची कारण मिमांसा समजुन घेणे व त्यावरील उपाय सुचविणे या दोन उद्देशासाठी निदानात्मक आराखडा वापरण्यात येतो. तसेच प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम तथ्य सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी, दैनिक वर्तमानपत्र, मासीके, पाशिके, संकेतस्थळाचा, शोधनिबंध याचा आधार घेण्यात आला.

प्रसारमाध्यमे आणि त्याची भूमिका :—

आज प्रसारमाध्यमाची झेप दुरवर पोहोचली आहे. हयामुळे प्रसारमाध्यमे सत्तेची व नफयाची साधने झाली आहेत पारंपारीक कल्पना बदलण्यासाठी, समाजाचा विकास करण्यासाठी समाजातील सर्व लोकांचे जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठी प्रसारमाध्यमाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

माहिती सर्वदुर पसरविण्याच्या कामात ही प्रसारमाध्यमे महत्वाची कामगीरी करू शकतात. वृत्तपत्रे व मासीके ही व्यापारी प्रकाशने आहेत. विविध क्षेत्रातील वेगवेगळया अभिरूचीचा वाचकासाठी त्यांना मजकुर घ्यावयाच्या असतो जानीव जागृती व वैचारीक सखोल लिखान हयाचे वाहक होऊ शकत नाहीत क्रियाशील कार्यकर्ते व वार्ताहर यांच्यातील परस्पराबद्दल संशयाची जळमटे दुर करण्यास परस्परामध्ये समज व सहकार्यासाठी एक आचारसहिंता निर्माण होण्यास त्यांच्यात एक संवाद होणे आवश्यक आहे.

वर्तमान पत्राच्या बातम्याद्वारे विचारी व विनोदी लेखाद्वारे, फोटोद्वारे वर्तमानपत्रामधून प्रभावीपणे मानवी जीवनाच्या विविध पैलूविषयी माहिती मांडल्या गेली मानवी जीवनात होणाऱ्या वेदना, संघर्ष, राग वर्तमानपत्रासारख्या माध्यमानी हजारो वाचकापर्यत पोहोचवला आहे. समाजातील विविध प्रश्नांना स्थान दिले. सहानुभुतिपूर्वक त्यांच्या प्रकाशनात प्रसिध्दी दिली. पाशिके, मासीके व दैनिकांमधून समाजातील मानवी जीवनावर स्तंभलेखन झाले. दुरदर्शनच्या जाळयामुळे शहरापासून तर खेडयापर्यंत नवनवीन कल्पना जाऊन पोहोचल्या त्यामुळे त्याचा परिणाम शहरीभागापासून तर खेडयाभागापर्यंत पोहचून मानवी जीवनात अनेक बदल घडून आले. आजच्या आधुनिक काळ्यात तर कानाकोपऱ्यातील माहिती घरबसल्या समाजातील माध्यमाद्वारे मिळयला लागली त्याला सोशल मिडीया म्हणतात. यात व्हाटसप, ट्विटर, हाईड, इ. चा समावेश होतो याद्वारे जगातील कुठल्याही कानाकोपऱ्यातील माहिती घरबसल्या आपल्या ॲन्ड्राईड मोबाईल द्वारे घरबसल्या मिळणे ही या धकाधकीच्या काळातील आनंदाची गोष्ट आहे. सोशल मिडीयाद्वारे ऑनलाईन चॅटींग, शॉपींग, ईमेल, तिकीट बुकींग, हॉटेल बुकींग, शैक्षणिक व्हीडीओ, मनोरंजन इत्यादी बरेच कार्य याद्वारे होतांना दिसून येतात. सामाजिक प्रभावासोबतच सांस्कृतीक, राजकीय, आर्थिक क्षेत्रावरही प्रभाव पडत असतो चित्रपट, दुरचित्रवानी, वृत्तपत्रातील लेख, जाहीराती, मासीके, नियतकालीके इत्यादीद्वारे पाच्छात जीवनशैली, आहार विहार फॅशन, वागणे, बोलने इ. मुळे शिष्टाचारात बदल झालेले दिसून येते. त्यामुळे सांस्कृतीक परिवर्तन झाले. कला, क्रिडाविषयक गाणी, संगीत, नुत्य, खेळ, इ. कार्यक्रम प्रसारमाध्यमातून प्रकाशीत करून कौशल्यात वाढ करण्याची संधी मिळाली आहे. प्रसारमाध्यमे हे आपल्या आयुष्याचा महत्वाचा घटक बनला आहे. असे म्हणता येईल की, मनुष्य

संपूर्णता माध्यमाच्या आहारी गेला आहे. प्रसार माध्यमे मानसासाठी जेवढी चांगली तेवढीच धोकादायक सुध्दा वाटू लागली.

**प्रसारमाध्यमाचे फायदे :—**

१. प्रसारमाध्यमाच्या जलदगतीने प्रसार झाल्यामुळे सामाजिक परिर्वतन सामाजिक विकास व सामाजिक शिक्षण या क्रियांना चालना मिळाली आहे. समाजातील अनिष्ठ रूढी व परंपराच्या संदर्भात लोकांच्या दृष्टीकोनात बदल करण्याचे काम प्रसारमाध्यमांनी कमी केला आहे.

२. प्रसारमाध्यमामुळे औपचारीक व अनौपचारीक शिक्षणाचे कार्य, वृत्तपत्रे, दुरचित्रवानी, रेडीओ यासारख्या माध्यमाद्वारे कुटूंबशिक्षण, आरोग्यशिक्षण, कृषीशिक्षण, सामाजिक शिक्षण, प्रौढशिक्षण, स्त्रीशिक्षण इत्यादी प्रभावीपणे देता येते.

३. प्रसारमाध्यमे सामाजिक सदस्याच्या सोडवनूकीत महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. वृत्तवाहिण्या समस्याचे विश्लेषण करून त्यांची कारणे, परिणाम व उपाय सांगतात त्यामुळे समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर दैववादी वृत्ती, पर्यावरण प्रदुषण, लोकसंख्या, भ्रुणहत्या, जातीभेद, राष्ट्रीय एकात्मता, महिलावरील अत्याचार, शेतकऱ्याच्या आत्महत्या, लैंगीक शोषण, गुन्हेगारी इ. समस्यांच्या संदर्भात प्रसारमाध्यमातून वाचा फोडल्या जाऊन लोकजागृती केली जाते.

४. प्रसारमाध्यमामुळे आपले जगणे सुलभ बनते. त्यामुळे आपल्याला संपूर्ण समाजाचे ज्ञान प्राप्त होते आपण २१ व्या शतकात प्रवेश केल्यामुळे समाजातील प्रत्येक क्षेत्रात दररोज नविन गोष्ट घडत असतात. त्यांची माहिती ज्ञान असणे आवश्यक आहे. आणि ती केवळ प्रसारमाध्यमाच्या मार्फत मिळते.

५. समाजात घडणाऱ्या घटनांचे ज्ञान लगेच प्राप्त होते. उदा. भिमा कोरेगाव, कोपर्डी प्रकरण, अश्या गोष्टी प्रसारमाध्यमातून आपल्यासमोर येतात आणि समाजात अनेक लोक हे वाईट दिशेने चालले आहेत. असे वाटते आणि ज्यांनी या घडवून आणल्या आहेत. त्यांना कायद्याने आणि प्रसार माध्यमाच्या दंड प्राप्त होतो.

**प्रसारमाध्यमाचे तोटे :—**

१. आपण रोज दुरदर्शन व इतर माध्यमातून विविध प्रकारच्या बातम्या पाहतो. यामध्ये चांगल्या बातम्या कमी तर वाईट बातम्या जास्त असतात. त्यामुळे समाजाचा दृष्टीकोन वाईट बनत चालला आहे.

२. २१ व्या शतकात जगणारे आपण समाज म्हणजे काय? ही भावना विसरून जगतो आहोत. कारण समाज म्हणजे जात किंवा धर्म ही भावना आता समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात रूजत असल्याचे दिसून येत आहे. आणि प्रसारमाध्यमेही अश्या बातम्यांना ब्रेकींग न्युज मध्ये दाखवून ती अनपेक्षीतपणे प्रत्येकाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न होतांना दिसून येतो.

३. संगणक गुन्हे व सायबर गुन्हे म्हणजे संगणक प्रणालीमध्ये बेकायदेशिररित्या प्रवेश करून संगणक प्रणाली निकामी करणे, तिचे नुकसान करणे, तिच्यात बदल करणे, महत्वाची माहिती, बौध्दीक मालमत्ता इ. चोरी करणे किंवा संगणकात जंतु व जिवाणू सोडून साठवलेली माहिती नष्ट करणे संगणकावरून अश्लील मजकुर प्रसारीत करणे इ. कार्य केले जातात.

४. संगणक कार्यप्रणालीवर प्रक्रिया करून गुन्हे केले जातात जसे क्रेडीट कार्ड संबंधातील अफरातफरीचे गुन्हे, अपहार, इलेक्ट्रानीक रक्कम हस्तांतरण संबंधीचे गुन्हे बँकांचे एटीएम कार्ड व खाते फसवणूक इ. मोठया प्रमाणात होतांना दिसून येते.

५. प्रसारमाध्यमामुळे विद्यार्थी हा जास्त प्रमाणात मोबाईल हाताळतो व लहान मुलला त्याची सवय लागुण आईबाबा व घरातील व्यक्तीशी न बोलता आपल्याच विश्वात रमतो त्यामुळे त्यांचा अभ्यासाकडे दुर्लक्ष होउन त्याचे विपरीत परिणाम दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. डॉ. हरीमोहन, 'रेडीओ और दुरदर्शन पत्रकारीता' तक्षशिला प्रकाशन, नवी दिल्ली २००८
२. निताळे, विनोद भटकळ, सुधीर सोरदे गोपी 'माध्यम आणि सामाजीक बदल' अथर्व पब्लीकेशन जळगाव.
३. निताळे, विनोद भटकळ, सुधीर सोरदे गोपी 'प्रसार माध्यमे आणि समाज' अथर्व पब्लीकेशन जळगाव.
४. डॉ. प्रदिप आगलावे 'सामाजिक संशोधन पध्दती' साईनाथ प्रकाशन, नागपूर
५. लोकप्रभा — दिवाळी २०१८
६. लोकप्रभा — ऑगस्ट २०१८

□□□